


दैनिक **अक्षराज**

अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : ३११
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, रविवार, दि.२२ जून २०२५


# नागपूरहून दिल्लीला जाणाऱ्या राजधानी एक्सप्रेसवर दगडफेक, प्रवाशांमध्ये खळबळ

**अक्षराज : वृत्तसंकलन**
**दि.२१, नागपूर :** ट्रेन नंबर २२६९१ या राजधानी एक्सप्रेसवर काही अज्ञातांनी काल रात्री(२० जून) दगडफेक केली. दिल्लीकडे रवाना झालेल्या या ट्रेनवर हबीबगंजजवळ दगडफेक झाल्याचे वृत्त आहे. अचानक झालेल्या या हल्ल्यामुळे प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण पसरले. यावेळी घाबरलेल्या प्रवाशांनी तत्काळ रेल्वे प्रशासनाला घटनेची माहिति दिली. घटनेचे गांभीर्य लक्षात घेता काही वेळाने आरपीएफ जवान रेल्वेच्या कोच मध्ये हजर झाले. त्यांनी रेल्वेच्या डब्यांची पाहणी केली आणि नुकसान झालेल्या डब्यांच्या काचांची दुरुस्ती करून गाडीला हिरवा कंदील दाखवला. या सगळ्या गदारोळात नागपूरहून दिल्लीकरिता वेळेत निघालेली राजधानी एक्सप्रेस तब्बल दोन तास रखडली.



मिळालेल्या माहितीनुसार, ट्रेन नंबर २२६९१ ही नागपूरहून सुटणारी राजधानी एक्स्प्रेस तिच्या वेळापत्रकानुसार दिल्लीकरिता रवाना झाली. रात्रीची वेळ असल्याने प्रवासी त्यांचे जेवण करत होते. दरम्यान, हबीबगंज परिसरातून जात असताना काही अज्ञातांनी ट्रेनवर दगडफेक करण्यास सुरुवात केली. अचानक झालेल्या या हल्ल्यामुळे ट्रेनमधील प्रवाशांमध्ये एकच गोंधळ उडाला. याचवेळेस एका कोच मध्ये काच फुटून दगड थेट प्रवाशांच्या जेवणाच्या ताटात पडला.

अचानक झालेल्या या हल्ल्यामुळे ट्रेनच्या कोचमध्ये आरडाओरड सुरू झाली. परंतु काही प्रवाशांनी प्रसंगावधान राखून रेल्वे ॲपच्या सहाय्याने रेल्वे प्रशासनाकडे मदतीसाठी विनंती पाठवली. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन रेल्वे प्रशासनाने आरपीएफ जवांनाना पाचारण केले. काही वेळातच अरपीफच्या जवानांनी रेल्वेचा ताबा घेतला. आणि नुकसान झल्येल्या कोचची पाहणी केली. ज्या कोचच्या काच फुटल्या होत्या त्या दुरुस्त करण्यात आल्या. सर्व पाहणी केल्यानंतर आणि खात्री करून ट्रेनला पुन्हा राजधानी दि दिशेने रवाना करण्यात आले. काहि समाजकंटक जाणून बूजून अशा घटना घडवत असतात. त्यांच्या अशा घातपाती कारवायांमुळे निष्पाप प्रवाशांचा जीव धोक्यात येतो. अशा समाजकंटकांना पकडुन त्यांना कठोरात कठोर शिक्षा व्हावी अशी मागणी प्रवाशांकडून सातत्याने केली जाते. ट्रेनवर दगडफेक करण्याचा हा प्रकार फार पूर्वीपासून होत आहे. विशेषतः लांबपल्ल्याच्या गाडीमधून प्रवास करताना प्रवाशांनी जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागतो. त्यामुळे अशा घटनांना आळा बसला पाहिजे आणि गुन्हेगारांना कठोर शिक्षा झाली पाहिजे अशी प्रवाशांची मागणी जोर धरू लागली आहे.

# रेशनकार्ड व ऑनलाइन प्रक्रिया गतिशील करा - रामदास फुले

## अन्न व नागरी पुरवठा मंत्री भुजबळ यांना निवेदन...

**अक्षराज : वसंत रांधवण**
**दि.२१, अहिल्यानगर :** गोरगरीब व वंचित नागरिकांना नियमितपणे शिधा धान्य मिळावे, यासाठी अडथळा ठरत असलेली रेशनकार्ड व ऑनलाईन प्रक्रिया विनाविलंब व्हावी, या मागणीसाठी महात्मा फुले समता परिषदेचे नगर तालुकाध्यक्ष रामदास फुले यांनी अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी निवेदन दिले.

फुले यांनी भुजबळ यांची मुंबई, बांद्रा येथे भेट घेऊन गरजू लाभार्थ्यांच्या समस्या मांडून लक्ष वेधले. अहिल्यानगर जिल्ह्यासह तालुक्यातील अनेक लाभार्थ्यांची रेशनकार्डची नोंदणी अद्याप अपूर्ण आहे, तर काहींच्या कार्डावर धान्य वितरण रखडलेले आहे.



रेशन कार्डासाठी ऑनलाईन अर्ज प्रक्रिया अत्यंत संथ असून महिनोमहिने प्रलंबित राहत आहे. यामध्ये अनेकांना खासगी एजंटकडेच धाव घ्यावी लागते, अन्यथा प्रक्रिया मार्गी लागत नाही. परिणामी गोरगरीब नागरिकांना अन्नधान्यापासून वंचित रहावे लागत असून, ही बाब अत्यंत गंभीर असल्याचे निवेदनात म्हंटले आहे.

संबंधित यंत्रणांनी रेशनकार्ड व ऑनलाईन प्रक्रियेची अंमलबजावणी अधिक पारदर्शक व गतीशील करावी. जेणेकरून गोरगरिबांना शिधा धान्य मिळण्याचा मार्ग मोकळा होवा. तसेच रेशन कार्ड व ऑनलाईन प्रक्रिया गतिशील करून धान्य वितरणाच्या अडचणी दूर करण्याचे रामदास फुले म्हणाले. यावेळी अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, माजी खासदार समीर भुजबळ, आमदार पंकज भुजबळ, समता परिषदेचे प्रदेश उपाध्यक्ष अंबादास गारुडकर, सत्संग मुंडे, डॉ. स्नेहा कातकडे, कार्याध्यक्ष बापूसाहेब भुजबळ, प्रचारक नागेश गवळी, जिल्हाध्यक्ष सुभाष लोंढे, अनिल निकम, अनिल गाडीलकर, सुभाष गायकवाड बंडू कोथिंबीरे, शंकर भुजबळ,पारनेर तालुका उपाध्यक्ष पत्रकार वसंत रांधवण, बबनराव घुमटकर, अनिल चौधरी आदींसह समता परिषदेचे सदस्य उपस्थित होते.

# मतदार यादी नाव नोंदणी व दुरुस्ती मोहिमेत राजकीय पक्षांनी जनजागृतीसाठी सहकार्य करावे : आयुक्त पालीवाल

**अक्षराज : वसंत वडस्कर**
**दि.२१, चंद्रपूर :** आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकांच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाची तयारी सुरु झाली असून प्रभाग रचना आदेश तसेच मतदार यादी अद्ययावतीकरण मोहिमेसंदर्भात राजकीय पक्षांची संयुक्त बैठक गुरुवार दि. १९ जून रोजी चंद्रपूर मनपा राणी हिराई सभागृहात घेण्यात आली. आगामी निवडणूकांमध्ये १८ वर्षे पूर्ण करणाऱ्या सर्व पात्र मतदारास मतदार यादीत आपले नाव नोंदविणे शक्य व्हावे, सर्व पात्र मतदारांना मतदान करता येऊन मतदानाचे प्रमाण वाढावे यादृष्टीने केल्या जाणाऱ्या उपाययोजनांवर चर्चा करण्यात आली. याप्रसंगी निवडणूक निर्णय अधिकारी ७१ - चंद्रपूर विधानसभा क्षेत्र तथा उपविभागीय दंडाधिकारी संजय पवार, सहा. निवडणूक अधिकारी ७१- चंद्रपूर विधानसभा क्षेत्र तथा तालुका दंडाधिकारी विजय पवार, मनपा आयुक्त विपीन पालीवाल, उपायुक्त मंगेश खवले, उपायुक्त संदिप चिद्रावार




तसेच विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी व प्रतिनिधी उपस्थित होते. आगामी निवडणूकीसाठी प्रशासनातर्फे तयारी पूर्ण केली जात आहे. या बैठकीत शासनाकडून निर्गमित प्रभाग रचना आदेशावर सविस्तर चर्चा करण्यात आली. नव्याने प्रस्तावित प्रभागांची माहिती, मार्गदर्शन तसेच नागरिकांपर्यंत योग्य माहिती पोहोचविण्यासाठी नियोजन या विषयावर चर्चा झाली. प्रशासनामार्फत मतदार जनजागृती व्यापक प्रमाणात होणार असून येत्या विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रमानुसार मतदार यादीमध्ये नाव समाविष्ट करणे, मतदाराची नावे वगळणे, स्थानांतरण करणे तसेच नावात दुरुस्ती करण्याची संधी मिळणार आहे. या विशेष मोहिमेमध्ये सर्वांनी सहभागी व्हावे व उपलब्ध संधीचा फायदा घेण्याचे आवाहन आयुक्त विपीन पालीवाल यांनी केले.

**निवडणूक कार्यक्रमात राजकीय पक्षांचे सहकार्य महत्वाचे : संजय पवार**

निवडणूक निर्णय अधिकारी संजय पवार यांनी सांगितले की, ' मतदार यादी अद्ययावतीकरण ही लोकशाहीची मूलभूत प्रक्रिया आहे. सर्व पात्र नागरिकांनी आपली नोंदणी करुन लोकशाही हक्क बजावणे आवश्यक आहे. या प्रक्रियेस जनजागृतीसाठा सर्व पक्षांनी सक्रिय सहभाग द्यावा. ' बैठकीदरम्यान सर्व राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींनी पारदर्शक, सुसूत्र व शांततेपूर्ण निवडणूक प्रक्रियेसाठी प्रशासनास सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

# सातपूरमध्ये अवैध सावकारी प्रकरण : भाजप पदाधिकारी सागर वैष्णवविरुद्ध गुन्हा दाखल

**दि.२१, सातपूर :** सातपूरमध्ये अवैध सावकारीचे एक नवीन प्रकरण समोर आले आहे. या प्रकरणात भाजपचे पदाधिकारी सागर भूषण वैष्णव यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. वैष्णव हे गरजूंना जास्त व्याजाने पैसे देत होते. त्यांच्या घरातून काही कोरे धनादेश आणि स्टॅम्प पेपर पोलिसांना सापडले. एका व्यक्तीने पोलिसांकडे तक्रार केल्यानंतर हे प्रकरण उघडकीस आले.

यामुळे परिसरात खळबळ माजली आहे.सागर वैष्णव हे सातपूरच्या श्रमिकनगर भागात राहायचे. ते भाजपचे सदस्य होते आणि तिथे जनसंपर्क कार्यालय चालवत होते. याच कार्यालयातून ते लोकांना सावकारी करत होते. ते लोकांना १० ते २० टक्के व्याजाने पैसे द्यायचे. त्यानंतर त्यांच्याकडून दुप्पट पैसे वसूल करायचे, असे आरोप आहेत.वसंत घायाळ नावाच्या एका व्यक्तीने याबद्दल पोलिसात तक्रार नोंदवली आहे.

घायाळ यांनी सांगितले की, त्यांनी वैष्णवकडून १.२० लाख रुपये घेतले होते. हे पैसे त्यांनी १० टक्के मासिक व्याजदराने घेतले होते. त्यांनी आतापर्यंत १.४० लाख रुपये व्याज भरले आहेत. तरीही वैष्णव त्यांच्याकडे अजून ५५ हजार रुपयांची मागणी करत होता.

घायाळ यांनी आणखी एक गंभीर आरोप केला आहे. वैष्णवने त्यांना धमकावले. तसेच त्यांच्या 'एमआयडीसी'मधील वर्कशॉपमधील मशिनरी दुसऱ्या व्यक्तीला चालवण्यासाठी दिली, असेही त्यांनी तक्रारीत नमूद केले आहे. या प्रकरणाची चौकशी सहकार खात्याकडे होती. त्यामुळे तक्रार दाखल होऊनही वैष्णव यांच्यावर लगेच कोणतीही कारवाई झाली नाही. घायाळ यांनी मात्र हार मानली नाही. त्यांनी सतत पाठपुरावा करून सहकार खात्याकडून या प्रकरणाची चौकशी करून घेतली.

## थोडक्यात

# राष्ट्रीय महामार्गातील दोन टप्प्यांसाठी ४२१ कोटींची कामे मंजूर खा.बजरंग सोनवणेंनी करून दाखविले...

**अक्षराज : शिवाजी औसेकर**
**दि.२१, केज (बीड) :** जिल्ह्यातून अनेक राष्ट्रीय महामार्ग गेले असून वाहूतुकीच्या दृष्टीने माजलगाव ते केजमधील धारूर जवळचा घाट ब्लॅकस्पॉट ठरला होता. शिवाय लातूर ते लोखंडीसावरगाव दरम्यान बर्दापुर फाटा ते लोखंडी सावरगाव रस्त्यातील उर्वरित लांबीचे चौपदरीकरण करण्याची बाबही महत्वाची होती. याबाबत खा.बजरंग सोनवणे यांनी वारंवार पाठपुरावा केला आणि या पाठपुराव्याला केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी पाठबळ देत ४२१ कोटींची ही दोन्ही कामे सन २५-२६ च्या वार्षिक नियोजनामधे मंजुरीस प्रस्तावित केली आहेत.



राष्ट्रीय महामार्ग क्र.५४८(सी) माजलगाव ते केजमधील धारुर जवळच्या घाट अरुंद असून चढ जास्त असल्यामुळे वारंवार अपघात होत होते, तसेच प्रवासात वेळ लागत होता. हा घाट ब्लॅकस्पॉट म्हणूनही जाहिर करण्यात आलेला आहे. ही बाब विचारात घेऊन बीडचे खा.बजरंग सोनवणे यांनी धारुर घाटातील रस्त्याला पर्यायी मार्ग म्हणून थेटेगव्हाण मार्गे कमी चढाईचा व अधिक रुंदीचा चौपदरी रस्ता करण्यासाठी जुलै २४ पासून केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचेकडे व रस्ते वाहतूक व महामार्ग विभागाकडे सतत पाठपुरावा केला. सन २५/२६ चा कृति आराखडा व वार्षिक नियोजनात सदरील काम घेण्यात आले असून या ११ कि.मी रस्त्यासाठी तब्बल १७१ कोटी रुपये खर्च प्रस्तावित केला आहे. गेल्या अनेक वर्षापासून धारुर घाटातील वाहतुक समस्या सोडवण्यासाठी आग्रही मागणी होत होती. घाटामधे चढ जास्त असल्यामुळे जड वाहतुक लांबच्या मार्गाने करावी लागत होती. अरुंद रस्त्यामुळे घाटामधे अपघाताचे प्रमाण वाढले होते. हे काम पूर्ण झाल्यास शेगाव ते पंढरपूर रस्ता वाहतुक सुरळीत होईल. माजलगाव, वडवणी तालुक्यातील शेतकऱ्यांची शेतीमाल वाहतुक सुलभ होणार आहे. या सोबतच लातूर ते लोखंडीसावरगाव दरम्यान बर्दापुर फाटा ते लोखंडी सावरगाव रस्ता या उर्वरित लांबीचे चौपदरीकरण करण्याची मागणी करण्यात आली होती. हे २५० कोटी रुपये अंदाजित किंमत असलेल्या १८ कि.मीचे काम सन २५-२६ च्या वार्षिक नियोजनामधे मंजुरीस प्रस्तावित करण्यात आले असून दोन्ही कामे करण्यास उच्च प्राधान्य देण्यात आलेले आहे. खा.बजरंग सोनवणे यांनी राष्ट्रीय महामार्गात येणारे अडथळे आणि महत्वाच्या विषयाकडे लक्ष घातलेले आहे. धारूर घाटातील ब्लॅकस्पॉटवर अनेकदा अपघात होवून बळी गेलेले आहेत. परिणामी, अनेक संसार उघड्यावर पडलेले आहेत. आता याठिकाणी पर्यायी मार्ग काढून येथील अपघात टाळण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले आहे.

**या कामांसाठीही सुरू आहेत प्रयत्न...**

अहमदपूर ते पिंपळा धायगुडा, धायगुडा पिंपळा ते लोखंडी सावरगाव व लोखंडी सावरगाव ते मांजरसुंबा या रस्त्यांचे चौपदरीकरणाचे प्रस्ताव समितीकडून मंजुरी करुन घेऊन त्या कामांनाही प्राधान्याने मंजुरी घेण्यात येईल.

मंजुरी देण्यात आलेल्या दोन्ही कामाच्या निविदा लवकरच होऊन प्रत्यक्ष कामास सुरुवात होईल. केंद्रीय रस्ते वाहतूक व दळणवळणमंत्री नितीन गडकरी यांचे मोलाचे सहकार्य लाभत असून त्याबद्दल मी जिल्ह्याच्या वतीने त्यांचे आभार मानतो.

**- खा.बजरंग सोनवणे, बीड.**

# सफाई इंटर्नशिप प्रोग्राम ८.० ला तरुणाई च उत्स्फूर्त सहभाग

**अक्षराज : घनश्याम आंबोकर**
**दि.२१, मिरा-भाईंदर :** शहराच्या स्वच्छतेसाठी तरुणाईने खांद्याला खांदा लावून काम केल्याचे उत्तम उदाहरण म्हणजे 'सफाईमित्र इंटर्नशिप प्रोग्राम ८.०'. मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या वतीने राबवण्यात आलेला हा उपक्रम १९ ऑगस्ट २०२४ ते २० जानेवारी २०२५ या कालावधीत यशस्वीरित्या पार पडला.या इंटर्नशिपच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना स्वच्छता मोहिमा, जनजागृती रॅली, क्षेत्रीय निरीक्षण, माहिती संकलन, दस्तऐवजीकरण, तसेच महापालिकेच्या विविध विभागांशी प्रत्यक्ष समन्वय साधण्याचा अनुभव मिळाला. या उपक्रमाने केवळ प्रशिक्षणच दिले नाही, तर शहराच्या स्वच्छतेसाठी योगदान देण्याची संधीही निर्माण केली आहे.

'सफाईमित्र इंटर्नशिप प्रोग्राम ८.०'. पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र वितरण समारंभ मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्यालय येथे १९ जून २०२५ रोजी माननीय आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद अ. शर्मा (भा.प्र.से.) यांच्या निर्देशानुसार व शहर अभियंता दिपक खांबीत यांच्या उपस्थितीत सर्व सहभागी तरुणांना त्यांच्या समर्पण, मेहनत आणि समाजासाठी दिलेल्या योगदानाबद्दल प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले.महानगरपालिका प्रशासनाने या युवा सहभागाचे विशेष कौतुक करताना सांगितले की, सफाईमित्र इंटर्नशिप हा केवळ एक उपक्रम नाही, तर तरुणांमध्ये सामाजिक बांधिलकी व नागरी जबाबदारी जागवणारी एक चळवळ आहे.

शहर स्वच्छतेच्या दिशेने वाटचाल करताना तरुणाईचा आवाज आणि कृती दोन्ही महत्त्वाची आहेत हे या उपक्रमातून पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. भविष्यातही अशा उपक्रमामध्ये अधिकाधिक तरुणांनी सहभागी व्हावे, असे आवाहन मिरा भाईंदर महानगरपालिकेने शहरातील विद्यार्थ्यांना केले आहे.या प्रमाणपत्र वितरण समारंभात कार्यकारी अभियंता श्री. शरद नानेगावकर (पाणी पुरवठा विभाग) तसेच इतर मनपा अधिकारी,कर्मचारी व प्रमाणपत्र प्राप्त विद्यार्थी उपस्थित होते.




## भारतीय संघ इतिहास घडवेल ?

भारताच युवा क्रिकेट संघ इंग्लंडच्या दौऱ्यावर गेला असून तिथे दोन्ही देशात पाच कसोटींची मालिका होणार आहे. या मालिकेतील पहिल्या कसोटी सामन्यास २० जून पासून सुरुवातही झाली आहे. पहिल्या कसोटीच्या पहिल्या दिवशी भारतीय फलंदाजांनी चांगली कामगिरी करत ३०० च्या वर धावा काढल्या त्याही फक्त तीन गडी गमावून. पहिल्याच दिवशी भारताचा सलामीवीर यशस्वी जयस्वाल आणि नवनियुक्त कर्णधार शुभमन गिल यांनी शतके झळकावली. उपकर्णधार ऋषभ पंतने अर्धशतक झळकावले. दोघेही पहिल्या दिवशी नाबाद असल्याने दुसऱ्या दिवशी त्यांच्या धावात भरच पडेल कदाचित शतकाचे द्विशतकात आणि अर्धशतकाचे शतकात रूपांतर झाले असेल. असो या आव्हानात्मक आणि दीर्घ दौऱ्याची सुरुवात तर चांगली झाली या बद्दल या युवा खेळाडूंचे अभिनंदन करायला हवे. मी या संघाला युवा संघ असे म्हणतो कारण या संघातील सर्वच खेळाडू युवा आहेत. बुमरा, करून नायर आणि के एल राहुल सोडल्यास सर्व खेळाडू तिशीच्या आतील आहेत. या खेळाडूंना कसोटी सामने खेळण्याचा अनुभव कमी आहे. काही खेळाडू तर पहिल्यांदाच इंग्लंडमध्ये खेळत आहेत. इंग्लंडमध्ये खेळणे हे नेहमीच आव्हानात्मक असते कारण तेथील स्विंग होणाऱ्या चेंडूसमोर भल्या भल्या फलंदाजांचा निभाव लागत नाही. त्यात तेथील हवामान बेभरवशाचे आहे. क्षणात ऊन तर क्षणात पाऊस पडत असल्याने खेळपट्टी नेहमी आपला रंग बदलत असते. शिवाय इंग्लंडच्या खेळपट्टीवर भारताची कामगिरी नेहमीच निराशाजनक राहिली आहे. भारताने इंग्लंडमध्ये शेवटचा मालिका विजय १८ वर्षापूर्वी म्हणजे २००७ साली राहुल द्रविडच्या नेतृत्वाखाली मिळवला होता. त्यानंतर अनेकदा भारताने इंग्लंडचा दौरा केला मात्र भारताला इंग्लंडमध्ये मालिका विजय मिळवता आला नाही. महेंद्रसिंग धोनी, विराट कोहली, रोहित शर्मा यांच्या नेतृत्वाखाली भारताने इंग्लंडमध्ये कसोटी मालिका खेळल्या. मालिकेत एखादा दुसरा विजय जरूर मिळाला पण भारताला मालिका खिशात घालता आली नाही. या अठरा वर्षात भारतीय संघात अनेक दिग्गज खेळाडू येऊन गेले. त्यांनी स्वतःच्या धावांच्या राशी उभारल्या, विक्रमांचे इमले रचले पण सांघिक कामगिरी करून इंग्लंडमध्ये मालिका विजय मिळवण्याचा चमत्कार त्यांना करता आला नाही. हा चमत्कार शुभमन गिलच्या नेतृत्वाखालील हा युवा संघ करू शकेल का ? असा प्रश्न क्रिकेट विश्वात विचारला जात आहे. याचे उत्तर प्रथम दर्शनी नाही असेच देतील कारण हा भारताचा हा संघ युवा आणि अननुभवी आहे. इंग्लंड संघापुढे यांचा निभाव लागणार नाही असेच सर्वांना वाटते मात्र या युवा खेळाडूंनी स्वतःच्या क्षमतेने खेळ केला, आपल्या नैसर्गिक गुणवत्तेला न्याय दिला आणि मागील इतिहास विसरून संघ म्हणून एकजुटीने खेळ केल्यास हा संघ इंग्लंडला हरवून इतिहास घडवू शकतो. तशी क्षमता या संघात निश्चित आहे. या युवा खेळाडूंमध्ये जोश आहे. पण केवळ जोश असून उपयोग नाही. जोश सोबतच होशही असावा लागतो. कसोटी सामना जिंकण्यासाठी संयम खूप महत्वाचा आहे. टी २० प्रमाणे चौकार षटकार मारून धावा इथे निघत नाही. इथे संयम खूप महत्वाचा आहे. या खेळाडूंनी संयमाने फलंदाजी करून मोठी धावसंख्या उभारली आणि गोलंदाजांनी इंग्लंडचे वीस फलंदाज बाद करण्यावर भर दिला तर हा संघ इंग्लंडला निश्चितच आश्चर्याचा धक्का देऊ शकतो. अर्थात यावेळचा इंग्लंडचा संघही पूर्वीतका बलवान नाही. कर्णधार बेन स्टोक्स व ज्यो रूट वगळता त्यांचा एकही फलंदाज नावाजलेला नाही. त्यांची गोलंदाजीही आता पूर्वी इतकी घातक राहिली नाही. जेम्स अँडरसन आणि स्टुअर्ट ब्रॉड यांच्या निवृत्तीनंतर त्यांची जागा घेणारा एकही गोलंदाज त्यांना मिळाला नाही. मार्क वूड आणि जोफ्रा आर्चर हे त्यांचे मुख्य वेगवान गोलंदाज दुखापतींने ग्रासले आहेत. ते किती कसोटी खेळतील हे खुद्द ते ही सांगू शकणार नाही. त्यांचा फिरकी गोलंदाजही नवखा आहे त्यामानाने आपली गोलंदाजी खूप चांगली आहे. जगातील सर्वोत्तम वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमरा भारताच्या ताफ्यात आहे तो तीन कसोटी खेळणार आहे त्यामुळे या तीन कसोटीत भारताचे पारडे निश्चितच जड राहील. बुमराला सिराज, प्रसिद्ध कृष्णा, अर्शदीप सिंग यांची साथ मिळेल. जडेजा, कुलदीप यादव हे जागतिक स्तरावर नावाजलेले फिरकी गोलंदाज भारताच्या ताफ्यात आहे. नितीश रेड्डी आणि शार्दुल ठाकूर हे अष्टपैलू खेळ करण्यात माहीर आहेत त्यामुळे हा संघ जरी नवोदित, युवा खेळाडूंचा असला तरी त्यांनी आपल्या क्षमतेनुसार खेळ केला तर हा संघही इतिहास घडवू शकतो यात शंका नाही. इंग्लंड दौऱ्यावर असलेल्या भारतीय संघाला मालिका विजयासाठी मनापासून शुभेच्छा!

# चांगले कोण आणि वाईट कोण ?

आजकाल चांगले कोणाला म्हणावे आणि वाईट कोणाला म्हणावे?हे कळणे कठीण झाले आहे.कारण चांगले वागणे लोकांना खटकत आहे आणि जे लोक वाईट वागतात त्यांची वाहवा केली जात आहे.याचा अर्थ असा होतो की जगात चांगल्या लोकांची संख्या कमी झाली असून वाईट लोकांचा सुळसुळाट सुरू झाला आहे.तुम्ही निर्व्यसनी असाल,तुम्ही दारू, सिगारेट,बिडी पित नसाल तर तुम्ही पक्के वाईट व्यक्ती आहात आणि तुम्हाला सगळी व्यसने असतील तर समाजाच्या दृष्टीने तुम्ही खरोखर चांगली व्यक्ती आहात. आपल्या अवतीभवती अशी विचित्र परिस्थिती निर्माण झाली असल्याचे आपण ठळकपणे पाहत आहोत. जिकडे तिकडे दुर्जनांचा संचार वाढला आहे आणि तेच लोक समाजाचे आणि व्यवस्थेचे नेतृत्व करताना दिसतात.या व्यवस्थेत बोल बच्चन लोक वरचढ झाले आहेत.आणि कर्तृत्ववान परंतु मोजके बोलणारे लोक अभ्याग्याचा मार खात आहेत.

एक काळ असा होता की वाईट लोक लपून छपून त्यांचे वाईट कृत्ये करायचे.चांगल्या लोकांपुढे येण्यास ते घाबरायचे.अंधारात ते हिंडायचे आणि दिवसा लपून छपून राहायचे. आता काळ उलटला आहे.जिकडे तिकडे दुर्जनांचा संचार वाढला आहे आणि सज्जन लोक फार



दुर्मिळ झाले आहेत.एके काळी एसटी बसमध्ये महिलांना आणि वृध्दांना पुरुष प्रवासी उठून आपली जागा द्यायचे. शासनाने एसटी बसमध्ये महिलांना आणि वृध्दांना तिकीट सवलत दिल्यापासून हे चित्र दिसणे आता बंद झाले आहे. मंदिरात दर्शनासाठी व्हीआयपी पास सुरू झाले आणि रांगेत उभे राहून दर्शन घेणारे लोक चिडू लागले आहेत.अगदी थोड्या फी मध्ये रुग्णांवर उपचार करणारे डॉक्टर कुठे गायब झाले आहेत कळायला मार्ग नाही.आता जिकडे तिकडे दवाखाने कमाईचे साधन बनले आहेत.समाजकारणासाठी राजकारण करणारे लुप्त होऊन केवळ सत्तेसाठी भांडणारे राजकारणी पाहिले आणि आपले अमूल्य मत विकणारे मतदार पाहिले की मनाला खूप वेदना होतात.तसेच महामानवांच्या जयंती सोहळ्यात नशापान करून नाचणारे पाहिले की मनाला खूप खूप वेदना होतात.

आईवडिलांच्या कष्टाची जाणीव ठेवून वृध्द आईवडीलांची सेवा करणारे फार कमी आहेत हे ठळक दिसते.परंतु,ज्या वृध्दांना दरमहा शासकीय अनुदान मिळते ते हिसकावून घेणाऱ्या औलादी पाहिल्या की हृदयात कालवा कालव होते.शारिरीक क्षमता क्षीण झालेले आईवडील शेतात राबतात आणि त्यांची तरूण मुले गावात कुठे तरी बसून मोबाईल वर गेम्स खेळतात तेव्हा अशा तरूण मुलांना आईवडिलांच्या कष्टाची जाणीव नसते.मनाजोगा हुंडा घेणारे जर नववधूचा छळ करत असतील तर ते लग्न म्हणजे एक प्रकारचा अमानुष व्यवहार झाला असे समजावे.शेतीत घाम गाळून दुप्पट तिप्पट उत्पन्न काढणाऱ्या शेतकरी मुलाला मुलगी देण्यापेक्षा शहरात कंपनी मध्ये दहा वीस हजाराची नोकरी करणाऱ्या मुलांना मुलगी देणारे पाहिले की राग येतो आणि हसू पण येते.

सरकारी शाळेत चांगले अध्यापन करणारे क्वालीफाईड शिक्षक असले तरी इंग्रजी शाळेच्या मोहापायी आपली मुले इंग्रजी शाळेत पाठवून शिक्षण व्यवस्थेचे वाटोळे करणारे पालक भविष्यात शिक्षण विकत घेण्यासाठी मानसिक दृष्ट्या तयार झाले आहेत असे चित्र सध्या निर्माण झाले आहे.महात्मा फुले यांनी मोफत आणि सक्तीच्या शिक्षणासाठी लढा उभारला होता आणि आज तो लढा राजकीय लोकांनी मागेल त्याला इंग्रजी शाळा देऊन कमकुवत केला आहे.मग चांगले कोण आणि वाईट कोण हे लक्षात येण्यास अजिबात वेळ लागणार नाही.कोणताही व्यवहार जात पाहून करणारे जातीसाठी माती खावी म्हणून अभिमानाने सांगतात परंतु,हेच लोक रक्ताची गरज पडली की जात व धर्म बघत नाहीत.ही दुटप्पी भूमिका काय कामाची?विज्ञानाने शोध लावलेल्या वस्तूंचा,वाहनांचा, उपकरणांचा आणि यंत्रांचा पुरेपूर वापर करून घेणारे सुशिक्षित व उच्च शिक्षित लोक जेव्हा ऐनवेळी अंधश्रद्धा पाळतात तेव्हा त्यांच्या शिक्षणाला काहीच अर्थ उरत नाही. मग विविध शोध लावणारे वैज्ञानिक चांगले की अंधश्रद्धा पाळणारे लोक चांगले यांचा सारासार विचार झाला पाहिजे. कामचुकार नोकरदार हे निरंतर कामचुकारपणा करतात. प्रामाणिक नोकरदार आपली ड्युटी नेहमी प्रामाणिकपणे व निष्ठेने पार पाडतात.आळशी व कामचुकार नोकरदारांचा दुर्गूण त्यांच्या अंगी कधीच उतरत नाही.

शेवटी जाता जाता एवढेच सांगावे वाटते की आजकाल काही लोक स्वतःच्या शून्य कर्तृत्वाची खूप जाहीरात करतात आणि ज्यांचे कार्य वाखाणण्याजोगे असते ते कधीच जाहीरातीच्या मोहात पडत नाहीत.काही लोक गरजेपेक्षा जास्त बोलतात,बोलून बोलून इतरांना बोअर करतात आणि काही लोक अगदी थोडेच परंतु परिणाम होईल एवढेच बोलतात. आता खरी गरज आहे आपण स्वतः चांगले आहोत की वाईट आहोत हे ठरवण्याची!

**- बबन दामोदर गुळवे**
**उमरगा कोर्ट ता.अहमदपूर**
**जि.लातूर.मो.९५४५४४२६४८.**

## निराधार मुलांसोबत शिवनाथ भांजी यांनी वाढदिवस केला साजरा



**अक्षराज : विश्वास नायगांवकर**

**दि.२१, तुळजापुर (धाराशिव) :** तुळजापूर येथील यशस्वी व्यावसायिक होतकरू तरून श्री शिवनाथ भांजी यांनी हारतुरे, आतीशबाजी व अनावश्यक खर्चाला फाटा देत नुकताच दि २१ रोजी आपला वाढदिवस श्री स्वामी समर्थ वस्तीगृह येथील निराधार मुलांसोबत साजरा केला. मुलांना शैक्षणिक साहित्य व खाऊचे वाटप करून समाजासमोर तरुण पिढीला एक चांगला संदेश देण्याच काम केलेले आहे. त्यांच्या या कार्याबद्दल मित्रपरिवारातून व शहरातील जेष्ठांकडून त्यांचे कौतुक होत आहे. यावेळी त्यांच्यासोबत संतोष लोंढे, दादा कोरे, सुनील आवटे, विकास खपले, नागेश साठे, संदीप गंगणे, शाम कुलकर्णी, गिरीश वराडे, इंद्रजीत रोकडे, आनंद हत्तीकर व मित्रपरिवार उपस्थित होते.

## वारी..

खांन्द्यावरती कावड
झाली खूपखूप जड
शंकर भेटीची ओढ
नर्मदेचे अमृत गोड

वारकरी करी वारी
चालले ते पंढरपुरी
अवघड यात्रा जरी
विठुराया ओढ भारी

दत्तात्रय गिरीनारी
दहा हजार पायरी
पाय सुजे थके तरी
चालतात भरभरी

केदारनाथ उंचावर
तापमान शून्यावर
मात करी बर्फावर
यात्रा चाले झरझर

अमरनाथाची यात्रा
अतिरेक्यांचा खतरा
अडीअडचणी सतरा
भाविकांची होई जत्रा

सर्वत्र भगवंत असता
काकष्टता यात्राकरता
हृदयात देव वसता
रानोमाळी उगा हिंडता

अक्षराज अचूक वेध, अचूक बातमी

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

# पाऊले चालती पंढरीची वाट...

वारी म्हणजे महाराष्ट्रातील विविध गावांमधून निघून पंढरपूर येथे येणारी सामुदायिक विठ्ठल भक्तांची पदयात्रा. वारी ही महाराष्ट्रातील एक धार्मिक व सांस्कृतिक परंपरा आहे. ही वारी आषाढ आणि कार्तिक महिन्यातील शुद्ध एकादशी अशा दोन्ही वेळा होते.

**वारी म्हणजे विठ्ठलाचे भक्तीचा लळा...**
**वारी म्हणजे वैष्णव भक्तांचा मेळा...**
**वारी म्हणजे आनंदाचा सोहळा...**

वारीही महाराष्ट्रातील एक धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरा आहे. पायी केल्या जाणाऱ्या पंढरीच्या वारीची परंपरा ही बरीच जुनी आहे. तेराव्या शतकात ही परंपरा असल्याचे उल्लेख सापडतात. ज्ञानदेवांच्या काळात त्यांच्या घराण्यात पंढरीच्या वारीची परंपरा होती. त्यांचे वडील वारीला जात होते, असा उल्लेख आढळतो. ज्ञानदेवांनी भागवत धर्माची पताका खांद्यावर घेऊन सर्व जातीपातीच्या समाजाला एकत्रितपणे या वारी सोहळ्यात सामील करून घेतले. संत एकनाथ महाराज, संत तुकाराम महाराज, यांनी सुद्धा वारीची परंपरा चालवली. ज्ञानदेवाच्या कर्तुत्वामुळे हा संप्रदाय प्रभावी ठरला. जे विठ्ठलाचे भक्त असती,ते येवोनी एक होती

**गावोनी भगवत् भक्ती विठ्ठलाचे नाम घेत**
**उत्तम मार्गी चालती....**

ज्ञानेश्वर, संत एकनाथ, संत तुकाराम, सोपानकाका, मुक्ताबाई, हे वारकरी संप्रदायातील महत्त्वाचे संत होत.

शेतकरी मोठ्या प्रमाणावर असतात. कष्टकरी, महिला, असा सगळ्यांचा सहभाग वारीत असतो. गेल्या काही वर्षांपासून मोठ्या कंपन्यांचे अधिकारी, कर्मचारी, शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थी, विद्यार्थिनी, निवृत्त जेष्ठ, यांचाही सहभाग दिसून येतो. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांचे मुलेही आता वारीत सहभागी होतात.

वारकरी संप्रदायात लहान-मोठा,गरिब-श्रीमंत, पुरुष-महिला हा भेदाभेद नाही. एकमेकांना माऊली म्हणून संबोधतात. नमस्कार करतात. तसेच नाम जपाने पुण्य मिळते हा भाव आहे. एकादशी आणि इतर पवित्र दिवशी नित्यनेमाने पंढरपूरला जाणे म्हणजेच वारी होय. जो नियमित वारी करतो तो वारकरी. वारकरी जो धर्म पाळतात त्याला वारकरी धर्म असे म्हणतात. वारकरी धर्मालाच भागवत धर्म म्हटले जाते. पंढरी नगरीचा स्पर्श , चंद्रभागेत स्नान, आणि विठोबाचे, पांडुरंगाचे दर्शन या इच्छेपोटी वारकरी वारी चुकवत नाहीत, अशी भागवत संप्रदायाची धारणा आहे. त्यामुळेच आषाढीवारी ही प्रत्येक वारकरी महिलापुरुषांच्या मनात आदराचे आणि श्रद्धेचे स्थान बाळगून आहे असे मानले जाते. ती त्यांचेसाठी आनंदवारीच असते.त्यांचे मागणे एकच असते..

**हेची दान देगा देवा...**
**तुझा विसर न व्हावा...तुझा विसर न व्हावा...**

विष्णूंचा अवतार असलेल्या पांडुरंगाचे/ विठ्ठलाचे हे सारेच भक्त असतात. आपले कर्तव्यकर्म निष्ठेने करीत असताना ते भगवंताचे विस्मरण होऊ देऊ नये यासाठी गळ्यात तुळशीची माळ घालतात. ह्या माळेचा जपमाळ म्हणून उपयोगाशिवाय, ती गळ्यात घातल्याशिवाय वारकरी होता येत नाही असे वारकरी पंथ सांगतो.

सात्त्विक आहार, सदाचारण, करावे. परोपकार आणि परमार्थही करावा. जीवनातील बंधनातून, मोहातून हळूहळू बाजूस होऊन पांडुरंगाशी एकरूप व्हावे, नामस्मरण करावे, असा साधा आणि उघड परमार्थ वारकरी संप्रदायाने सांगितला आहे. विठ्ठलाच्या दर्शनाने एक प्रकारची ऊर्जा मिळते. ती उर्जा- आनंद पुढील वारी पर्यंत वारकरी टिकवतो.

वारकरी धर्मात कोणत्याही कार्याची सुरुवात करताना पुंडलिक वरदा हरी विठ्ठल श्री ज्ञानदेव तुकाराम पंढरीनाथ महाराज की जय! असा जयघोष केला जातो. स्थानपरत्वे या जयघोषात पंढरीनाथ भगवान की जय असा वेगळे पणा आढळतो. अनेक ठिकाणी माउली ज्ञानेश्वर महाराजकी जय, जगद्गुरु तुकाराम महाराजकी जय, शान्तिब्रह्म एकनाथ महाराज की जय अशी विविधता आढळते. या जयघोषाला वारकरी महावाक्य किंवा वारकरी महाघोष म्हटले जाते.

वारीत अभंग, ओव्या, भारुड, हरीपाठ, ज्ञानेश्वरी, हे सगळे येत. जो तो आपल्याच नादात असतो.

वारीसाठी भक्तांना वाहनांची सुविधा देण्यात येते. यासाठी शासकीय स्तरावर योजना राबविल्या जातात.. दिंड्यांना शासनाने विसहजार अनुदान ही जाहीर केले आहे। जादा बसेसही सोडण्यात येतात. मार्गाची पाहणी करणे, रस्त्यांची स्वछता, वैद्यकीय सेवा, पिण्याचे पाणी यांची व्यवस्था महाराष्ट्र शासनातर्फेकेली जाते.

पंढरपूरला जात असलेल्या वारक-यांची सेवा करण्याची संधी समाजाच्या विविध स्तरातून स्वेच्छेने घेतली जाते. काही मंडळी वैयक्तिक किंवा कौटुंबिक स्तरावर अशी सेवा पुरवितात. ज्यामध्ये वारीच्या मार्गावर उभे राहून वारक-यांना खाद्यपदार्थ पुरविणे, पाण्याची व्यवस्था, कपडे, रेनकोट देणे अशी सेवा केली जाते. सामाजिक संस्था, औद्योगिक संस्था या सुद्धा वारक-यांना विविध सुविधा पुरवितात. यामध्ये त्यांची सेवा करणे असा भाव असतो. काही वैद्यकीय संस्था आणि रुग्णालये वारकरी भक्तांच्या शारीरिक चाचणी, उपचार यांची काळजी घेतात.

महाराष्ट्राच्या काना-कोपऱ्यातून ठिकठिकाणाहून लाखो भाविक लोक विठ्ठल नामाचा गजर करीत आषाढी एकादशीला पायी चालत येतात.हिलाच आषाढी वारी म्हणतात. चंद्रभागेत स्नान करून विठ्ठलाचे दर्शन घेतात. आषाढीला या दिवशी शेगाव येथून श्री संत गजानन महाराजांची पालखी, आळंदीहून ज्ञानेश्वरांची, देहूहून तुकारामांची, त्रंबकेश्वरहून निवृत्तीनाथांची, पैठणहून एकनाथांची, मुक्ताईनगरहून संत मुक्ताबाईची पालखी पंढरपूरला येते. सोपानदेवांची पालखी सासवड येथून येते.

उत्तर भारतातून कबिराची पालखी येते. हजाराने दिंड्या पंढरपूरच्या वाटेने पांडुरंगाचा जयघोष करत मार्गस्थ असतात.

आषाढ महिन्यातील (जून-जुलै) शुक्ल/ शुद्ध पक्षातील अकरावी तिथी ही प्रथमा एकादशी / महा एकादशी / देव-शयनी एकादशी म्हणून ओळखली जाते. हा मोठा पवित्र दिवस आहे. या दिवशी उपवास केला जातो. या दिवसापासून चातुर्मास (चार महिन्यांचा काळ) सुरू होतो, तो कार्तिकी एकादशीला संपतो. अशी मान्यता आहे की या दिवशी भगवान विष्णू हे, क्षीरसागरात शेषनागावर, योगनिद्रेस जातात आणि योगनिद्रेतून बाहेर येतात ते कार्तिकी एकादशीला (प्रबोधिनी एकादशी) या काळात मांसाहार वर्ज्य केला जातो.

ह्या काळात जमेल ते चातुर्मासात नियम करतात. (जप, पोथीवाचन, आदी)

पंढरपुराला उत्तरेकडे तीन व दक्षिण व पश्चिमेकडे प्रत्येकी एक द्वार आहे. महाद्वार पूर्वेकडे असून, ज्या अकरा पाय-या चढून गेल्यावर ते लागते त्यांतील एका पायरीला 'नामदेवाची पायरी' म्हणतात.

विठ्ठलाला तुळस आणि मंजिरीचा हार वाहतात.

तुळस श्रीलक्ष्मीचे प्रतीक आहे व श्रीलक्ष्मी ही श्रीविष्णूची पत्नी असल्यामुळे (श्री विठ्ठल हा श्रीविष्णूचे रूप आहे.) ती तुळशीच्या माध्यमातून श्रीहरी चरणी राहते. तर वारकरी स्वतः तुळशीच्या वाळलेल्या काड्या जाळून त्यात, कापूर, चांगले तुपा पासून बनवलेला बुक्का लावतो. ह्या बुक्क्याला फार महत्व आहे. बुक्का, तुळशीची माळ हे आवश्यक आहे. अर्थातच हे विठ्ठलाचे, पांडुरंगाचे भक्तिचे प्रतिकच आहे.

वारीच्या दरम्यान होणारे रिंगण हे वारीचे वैशिष्ट्य मानले जाते. कडूस फाटा, वेळापूर आणि वाखरी येथे रिंगण होते. रिंगण ही एक पवित्र आणि श्रद्ध्येय संकल्पना आहे. मोकळ्या मैदानात वारकरी परस्परांचे हात धरून गोलाकार उभे राहतात. यातील मोकळ्या जागेतून ज्ञानेश्वर महाराजांचा घोडा धावतो. याला आदराने माऊलीचा अश्व असे म्हणतात. या अश्वावर स्वतः ज्ञानेश्वर महाराज आरूढ होतात अशी वारकरी संप्रदायात धारणा आहे.

धावा म्हणजे धावणे. असे मानले जाते की पंढरपूरला पायी जात असताना संत तुकाराम महाराज यांना वेळापूर येथील छोटयाशा टेकडीवरून विठ्ठलाच्या देवळाच्या कळसाचे दर्शन झाले आणि विठ्ठलाच्या दर्शन ओढीने ते तिथून पंढरपूरपर्यंत धावत गेले. याचे स्मरण म्हणून वारकरी वेळापूरपासून पंढरपूरपर्यंत शेवटचा टप्पा धावत जातात.

आषाढी एकादशीच्या पहाटे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री सपत्नीक श्री विठ्ठल आणि रुक्मिणीची महापूजा करतात. याला शासकीय पूजेचा दर्जा दिलेला आहे. त्यांच्या बरोबरच वारकरी समुदायातील एका दाम्पत्याला प्रतिवर्षी पूजेचा मान मिळतो. असा मान मिळणे वारकरी संप्रदायात आदराचे समजले जाते.

संत साहित्याचे अभ्यासक डॉक्टर रामचंद्र देखणे म्हणतात वारी हा भगवत भक्तीचा नुसता अविष्कार नसून भक्ती प्रेमाची अनुभूती घेण्याची ती सहज स्थिती आहे. परब्रम्हला साठवीत साठवीत विवेकाच्या दिशेने होणारी उन्मत्त वाटचाल म्हणजे पंढरीची वारी. मानवी जीवनात परिवर्तनाच्या दिशेने पडणारे विवेकी पाऊल म्हणजे वारी. बहुतेक क्रियांमध्ये साधन खडतर असते तर साध्य आनंद रूप असते. वारीच्या वाटचालीत साधन आणि साध्य दोन्ही आनंद रूपच. ज्ञानरूप परमात्मा हे साध्य तर भक्ती वाटचाल हे साधन आहे.

प्रत्येक भक्ताला, वारकऱ्याला आषाढी एकादशीला पांडुरंगाचे दर्शन होणारच. कारण तो प्रत्येकाचे मनामनात आहे.

खूप मोठ्या संख्येने वारकरी ह्या आनंदवारीत सहभागी झालेले आहेत. आता वारकऱ्यांची पाऊले चालली आहे पंढरीच्या वाटेने...

**जय जय रामकृष्ण हरि...**
**विठ्ठल.... विठ्ठल... जय हरी विठ्ठल...**

**- दिलीप देशपांडे**
**मोबा. ८९९९५६६९१७**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
**हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.**
**या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत.** Email : newsaksharaj2021@gmail.com **संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२**

# ११ व्या आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा

## नियमीत योगा ही आरोग्यासाठी संजीवनी - विशेष पोलीस उपमहानिरीक्षक उमाप

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२१, नांदेड :** नियमीत योगा ही आरोग्यासाठी संजीवनी आहे. सर्वांनी या योग दिनाच्या औचीत्याने नियमीत योगा करुन आपले आरोग्य सुदृढ करावे, असे आवाहन विशेष पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी केले. आज ११ व्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

आयुष मंत्रालय, भारत सरकार, महाराष्ट्र शासन, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे, जिल्हा प्रशासन, जिल्हा पोलिस अधिक्षक कार्यालय, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, योग विद्या धाम, पतंजली योग समिती, जिल्हा योग संघटना, योग विद्येचा प्रसार करणाऱ्या स्थानिक संस्थांचे प्रतिनिधी व विविध खेळ संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार, दिनांक २१ जून २०२५ रोजी सकाळी ७ वा. पोलीस परेड मैदान, वजिराबाद, नांदेड येथे या आंतरराष्ट्रीय योग दिनाचे आयोजन करण्यात आले होते.




यावेळी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, जिल्हा पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार, मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, सहाय्यक जिल्हाधिकारी अनन्या रेडडी, निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर, अतिरिक्त पोलीस अधिक्षक सुरज गुरव, पोलीस उपअधीक्षक अश्विनी जगताप, शिक्षणाधिकारी माध्यमिक माधव सलगर, समाज कल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त शिवानंद मिनगीरे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार, जिल्हा क्रीडा अधिकारी जयकुमार टेंभरे आदींची उपस्थिती होती.

यावेळी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी उपस्थित नागरिकांना करो योग रहो निरोग असा संदेश देवून ११ व्या आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या शुभेच्छा दिल्या. आयुष मंत्रालय, भारत सरकारच्या वतीने २१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योगा दिन म्हणून आयोजित करण्याचे निर्देश दिले असून प्रधानमंत्री नरेंद्र मोदीजी यांनी सन २०१४ च्या राष्ट्रीय महासभेत २१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योगादिन म्हणून दरवर्षी साजरा करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. त्यानुषंगाने दरवर्षी २१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योगा दिन म्हणून जगभरात मोठया उत्साहाने साजरा करण्यात येतो. योगा दिनाच्या निमीत्ताने जगभरात योगासनाची परंपरा स्वीकारणे व ती अंगीकारणे, ही आपल्या देशासाठी अभिमानाची बाब आहे. योगा हा आपल्या भारतीय संस्कृती वारसाचा अविभाज्य घटक आहे.याप्रसंगी योग विदयाधाम व पतंजली योग समिती यांचेमार्फत उपस्थितांना आयुष मंत्रालय, भारतसरकार च्या प्रोटोकालनुसार पोलादवार (योगगुरु), शकुंतला कलंबरकर, अनिता नेरकर, राणी दळवी,सुजाता गोरेआदीनी योगासनाचे धडे दिले. याप्रसंगी संजय पवार, रवी पालमकर, रेणगुंटवार, शृती चिंतावार, मंगला जोंधळे, नारायण आष्टुकर आदी योगसाधकाच्या कृती मधील सुधारणा करण्याचे काम केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रलोभ कुलकर्णी यांनी तर आभार माध्यमिक शिक्षणाधिकारी यांनी मानले.या योग दिन कार्यक्रमासाठी जिल्ह्यातील पिनॅकल इंग्लिश मेडीयम स्कुल, डीव्हीएम इंग्लिश मेडीयम स्कुल व विविध शाळा/संस्थेतील विदयार्थी, जिल्हयातील एकविद्य क्रीडा संघटनेचे खेळाडू मुले-मुली व पदाधिकारी तसेच जिल्हयातील विविध शासकीय कार्यालयाचे अधिकारी/ कर्मचारी, पोलीस अधिकारी/ कर्मचारी, एसडीआरएफचे अधिकारी/कर्मचारी, जिल्हा योग संघटना व योग विद्येचा प्रसार करणा-या स्थानिक संस्थांचे प्रतिनिधी व योगप्रेमी आदीनी उत्सफूर्तपणे सहभाग नोंदवला. हा कार्यक्रम यशस्वी करणेसाठी जिल्हा क्रीडा अधिकारी जयकुमार टेंभरे यांचे मार्गदर्शनाखाली कार्यासन प्रमुख राज्य क्रीडा मार्गदर्शक बालाजी शिरसीकर, क्रीडा अधिकारी संजय बेतीवार, राज्य क्रीडा मार्गदर्शक शिवकांता देशमुख, चंद्रप्रकाश होनवडजकर, क्रीडा अधिकारी राहुल श्रीरामवार, विपुल दापके, कनिष्ठ लिपीक दत्तकुमार धुतडे, संजय चव्हाण,आनंद जोंधळे, हनमंत नरवाडे, मोहन पवार, सुभाष धोंगडे, चंद्रकांत गव्हाणे, विद्यानंद भालेराव, यश कांबळे, सोनबा ओव्हाळ आदींनी सहकार्य केले.

## योगामुळेच आपण निरोगी जीवन जगू शकतो - प्राचार्य डॉ.आरसुळे

**अक्षराज : बालासाहेब फुलपगार**

**दि.२१, पालम (परभणी) :** आपल्या भारतीय प्राचीन संस्कृतीमध्ये योगसाधनेला अनन्य साधारण महत्त्व आहे. अगदी प्राचीन काळापासून योगाचे महत्त्व त्याचे फायदे आणि योगासनाची गरज पटवून दिलेली आहे. शारीरिक, मानसिक तसेच आध्यात्मिक व भावनिक यांचे संतुलन नीट राहण्यासाठी योगासने करणे खुप गरजेचे आहे. यामुळे आपण निरोगी जीवन जगू शकतो असे प्रतिपादन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आत्माराम आरसुळे यांनी केले. ते आज माधवराव पाटील महाविद्यालयात २१ जून हा आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. याप्रसंगी बोलत होते




यावेळी योग गुरु प्रा.डॉ.के.पी. गुडदे व प्रा. डॉ.बी.एस.पवार यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना डॉ. आरसुळे म्हणाले आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्याचा मुख्य उद्देश लोकांना योगाच्या फायद्यांबद्दल जागरूक करणे आहे. योगा करणाऱ्या व्यक्ती ला शारीरिक आजार रोखता येतात, शरीर सक्रिय राहते, ताण तणाव कमी होतो. असे मनोगत व्यक्त केले. या दरम्यान उपस्थित योग गुरु यांनी योगाचे महत्व विशद करून प्रत्यक्ष सर्व योगासने करुन दाखवले.यानंतर योग प्रार्थना घेण्यात आली.

या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

## वासुंदे येथे आज आदिवासींसाठी मोफत जातीच्या दाखल्यांचा कॅम्प

### सुजित झावरे पाटील यांचा उपक्रम...

**अक्षराज : वसंत रांधवन**

**दि.२१, पारनेर (अहिल्यानगर) :** पारनेर तालुक्याच्या उत्तर भागात राहणाऱ्या आदिवासी समाजाच्या विकासासाठी गेल्या पंचवीस वर्षांपासून कार्यरत असलेले जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील यांच्या पुढाकाराने वासुंदे ठाकरवाडी येथे आज मोफत जातीचे दाखले वाटपाचा विशेष उपक्रम आयोजित करण्यात आला आहे. देवकृपा फाउंडेशनच्या सहकार्याने रविवार, दि. २२ जून २०२५ रोजी सकाळी १० वाजता हा कॅम्प होणार आहे. या उपक्रमाद्वारे आदिवासी कुटुंबांना शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी



आवश्यक असलेले जातीचे दाखले मोफत उपलब्ध करून दिले जाणार आहेत.

सुजित झावरे पाटील यांनी या उपक्रमाबाबत आपली प्रतिक्रिया व्यक्त करताना सांगितले, आदिवासी समाज हा आपल्या सामाजिक आणि सांस्कृतिक वारशाचा अविभाज्य भाग आहे. मात्र, अनेक कुटुंबांकडे जातीचे दाखले नसल्याने त्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळत नाही. गेल्या अनेक वर्षांपासून मी आदिवासी समाजाच्या प्रगतीसाठी काम करत आहे आणि हा उपक्रम त्याच दिशेने एक पाऊल आहे. आम्ही या कॅम्पच्या माध्यमातून सर्वसामान्य आदिवासी कुटुंबांना मोफत जातीचे दाखले उपलब्ध करून देऊ, जेणेकरून त्यांना शिक्षण, रोजगार आणि शासकीय योजनांचा लाभ घेता येईल. आदिवासी समाजाला मुख्य प्रवाहात आणणे आणि त्यांचे जीवनमान उंचावणे हेच माझे ध्येय आहे. झावरे पाटील पुढे म्हणाले, हा कॅम्प यशस्वी करण्यासाठी देवकृपा फाउंडेशन आणि स्थानिक प्रशासनाचे सहकार्य मोलाचे आहे. आदिवासी बांधवांनी या संधीचा लाभ घ्यावा आणि आपले हक्क मिळवावेत, असे आवाहन मी करतो. या उपक्रमामुळे आदिवासी समाजाला सशक्त करण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले जाणार आहे.

## पेसा कायद्याचे उल्लंघन; उलगुलान ब्रिगेड संघटना आक्रमक, जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार

**अक्षराज : निलेश कासट**

**दि. २१, पालघर :** पालघर जिल्ह्यातील बोईसर येथील पेसा ग्रामपंचायतीत आदिवासी सरपंच रजेवर असताना गैर-आदिवासी उपसरपंचाला प्रभारी सरपंच म्हणून अधिकार बहाल करण्यात आल्याचा आरोप करत उलगुलान ब्रिगेड संघटना आक्रमक झाली आहे. पेसा कायद्याचे व संविधानाचे हे गंभीर उल्लंघन असून संबंधितांवर तत्काळ कारवाई करण्यात यावी, अशी मागणी संघटनेकडून जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

उलगुलान ब्रिगेडचे संस्थापक अध्यक्ष अशोक दादा शिंगाडा, सचिव राजन सोनवणे, उपाध्यक्ष प्रकाश पाटकर, तालुका अध्यक्ष रुपेश दादोडा, संघटक किसन मेरे व उपसंघटक जयवंत पागी यांनी ही मागणी केली आहे.

बोईसर ग्रामपंचायतीचे सरपंच दिलीप धोडी हे आदिवासी असून सध्या ते वैद्यकीय कारणास्तव रजेवर आहेत. मात्र, त्यांच्या अनुपस्थितीत सरपंचाच्या अधिकारांची जबाबदारी घेण्यासाठी ग्रामसभेची मंजुरी न घेता थेट गैर-आदिवासी उपसरपंचाला प्रभारी सरपंच म्हणून नेमण्यात आल्याचा आरोप संघटनेने केला आहे. हा प्रकार पेसा कायद्याचा आणि भारतीय संविधानाचा सरळसरळ अपमान असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.पेसा कायद्यानुसार अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतींमध्ये आदिवासींनाच नेतृत्व मिळावे, यासाठी विशेष तरतुदी करण्यात आल्या आहेत. संविधानाच्या अनुच्छेद २४३ (ड), महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम २०१७ मधील कलम ३०(अ)(१३अ) आणि मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ मधील कलम ३५ नुसार सरपंच निवड व त्यांच्याविरोधात अविश्वास प्रस्तावाची प्रक्रिया स्पष्ट करण्यात आली आहे. मात्र, हे सर्व नियम डावलून थेट प्रभारी सरपंच म्हणून गैर-आदिवासीची नेमणूक करण्यात आली, हा प्रकार गंभीर असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

सदर प्रकरणात बोईसर ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक, प्रभारी सरपंच यांच्यावर देशद्रोह, फसवणूक व ॲट्रॉसिटी कायद्यान्वये सात दिवसांत कारवाई न झाल्यास अनुसूचित जमाती आयोगाकडे तक्रार दाखल करण्यात येईल, असा इशाराही निवेदनात देण्यात आला आहे. संबंधित अधिकार्यांवर विभागीय चौकशी व कायदेशीर कारवाई न केल्यास आंदोलन तीव्र करण्याचा इशारा उलगुलान ब्रिगेडने दिला आहे.

# थोडक्यात

## पाथर्डी शाळेत योग दिवस उत्साहात साजरा

**अक्षराज : विश्वास वराळे**



**दि.२१, धाराशिव :** कळंब तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पाथर्डी येथे शनिवार, दिनांक २१ जून २०२५ रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी योग दिनाबद्दल मुख्याध्यापक राजेंद्र बिक्कड यांनी विस्तृत माहिती सांगितली. योगशिक्षक धनंजय गव्हाणे यांनी विविध योगाचे प्रकार कृतीसह विद्यार्थ्यांसमोर सादर करून विद्यार्थ्यांकडून करून घेण्यात आले. विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने योगाचे प्रकार केले. तसेच काही विद्यार्थ्यांनी स्वतः समोर येऊन योगाचे प्रकार सादर केले. याप्रसंगी सहशिक्षिका सरोजिनी पोते, मनीषा पवार, सुरेखा भावले यांनी विद्यार्थ्यांना योगाचे धडे दिले. याप्रसंगी शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्ष अंजली यशवंत जाधव, समुदाय आरोग्य अधिकारी संदेश जोशी उपस्थित होते.

## वेसवी, नांदगाव अंगणवाडी आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा

**अक्षराज : उमेश तबीब**



**दि.२१, दापोली (रत्नागिरी) :** मंडणगड एकात्मिक बाल विकास सेवा योजना अंतर्गत बिट उमरोली येथील पर्यवेक्षिका एस.बी.कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली अंगणवाडी कें वेसवी, नांदगाव या ठिकाणी आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला. २१ जून हा दिवस संपुर्ण विश्वभरात योग दिवस साजरा केला जातो. निरोगी शरीर व स्वस्थ मनासाठी योग अतिशय उपयुक्त आहे. दररोज योग केल्याने शरीरात ऊर्जा व मनाला शांती मिळते. आजच्या धावपळीच्या काळात आपले शरीर निरोगी राखण्यासाठी खुप मदत होते. योगा मुळे खुप मोठे आजार टाळता येतात. ताणतणाव कमी होतो. शरीर व मन सशक्त. सक्षम करण्यासाठी योग हा महत्वाचा आहे. योगाचे महत्व आपल्या भारत देशाने जगाला दिले. आपली पुढील पिढी व बालके सुदृढ़, सक्षम, निरोगी राहण्यासाठी योग फार महत्त्वाचे आहे. तसेच आहार आरोग्य विषयी माहिती अंगणवाडी सेविका शलाका पवार यांनी उपस्थितांना दिली. या कार्यक्रमासाठी वेसवी ग्रामपंचायत सरपंच प्रविणा खाडे, ग्रामपंचायत सदस्य पुजा खाडे, सुर्वणा खाडे, सरस्वती शिंदे, सुलोचना खाडे, माता पालक सदस्य उपस्थित होते. तसेच मदतनीस नम्रता शिगवण यांचे ही सहकार्य लाभले. अंगणवाडी सेविका शलाका पवार यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## पनवेल मनपाच्या वतीने आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा



**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२१, पनवेल :** आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गर्शनाखाली आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्ताने पनवेल महानगरपालिकेच्या वतीने वडाळे तलावाजवळ भव्य स्वरूपात 'योग दिवस' साजरा करण्यात आला. पंतजली योग समितीचे, भारतीय नौसेनेचे निवृत्त लेफ्टनंट पतंजली योग समितीचे मुख्य प्रशिक्षक राम पलट यादव यांनी यावेळी उपस्थितांना योगासने व प्राणायम, ध्यान याबाबत मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. यावेळी विधान परिषदेचे आमदार विक्रांत पाटील, अतिरीक्त आयुक्त गणेश शेटे, उपायुक्त डॉ.वैभव विधाते, उपायुक्त मंगला माळवे, नगर रचनाकार राजेश कर्डिले, घनकचरा व स्वच्छता विभागप्रुख अनिल कोकरे, जिल्हा प्रभारी पतंजलि किसान सेवा समिति, पनवेल विभाग रविंद्र मोरे, संजय कुमार सिंह, विविध सामाजिक जिल्हा प्रभारी पतंजलि युवा भारत, पनवेल विभाग विकास सूर्यभान देशमुख, रामकेश शर्मा, प्रमिला शशिकुमार शेट्टी, पालिकेचे अधिकारी व कर्मचारी, नागरिक उपस्थित होते. भारताच्या प्राचीन संस्कृतीमध्ये योगाला प्रचंड महत्व होते. योगामुळे शरीर, मन दोन्हीही सुदृढ बनते. केवळ भारत देशच नाहीतर साऱ्या जगाला आता योगाचे महत्व पटले आहे. योगाभ्यासाच्या जनजागृतीसाठी २१ जून हा 'आंतरराष्ट्रीय योग दिन' म्हणून साजरा केला जातो. पनवेल मनपाच्या वतीने साजरा करण्यात आलेल्या या योग दिनाच्या कार्यक्रमाला पावसाळी वातावरण असून देखील सर्व वयोगटातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी पंतजली योग समितीचे राम पलट यादव यांनी, ताडासन, वक्रासन, भुजंगासन, त्रिकोणासन असे आसानाचे विविध प्रकार शिकवून त्याचे फायदे सांगितले. तसेच प्राणायमामध्ये कपालभाती, भ्रामरी, अनुलोम विलोम याबद्दल मार्गर्शन केले. याबरोबरच ध्यान करण्यास सांगून त्याचा शरीराला होणारा लाभ याबाबत सविस्तर माहिती दिली. त्याचप्रमाणे योग दिनाचे औचित्य साधून स्वच्छ, सुंदर व सदृढ पनवेल बनविण्याच्या दृष्टीने पनवेल महानगरपालिकेच्या प्रभाग समिती अ खारघर येथे योग दिवस आणि वृक्षारोपण कार्यक्रम राबवण्यात आला. तसेच योग दिनानिमित्त रॅली काढण्यात आली.

## नवी मुंबईतील शाळांमध्ये विद्यार्थ्यांनी गिरवले योगासनांचे धडे

**अक्षराज : जे. के. पोळ**




**दि.२१, नवी मुंबई :** आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त नमुंमपा क्षेत्रातील सर्व व्यवस्थापनांच्या व सर्व माध्यमांच्या शाळेतील विद्यार्थी व शिक्षकांनी उत्स्फुर्तपणे सहभाग घेत आपापल्या शाळांमध्ये आयोजित योगविषयक विविध उपक्रम यशस्वी केले.

आजचा अकरावा आंतरराष्ट्रीय योग दिन हा भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या मार्गदर्शनाखाली देश पातळीवर सकाळी ६.३० ते ७.४५ या कालावधीत संपन्न झाला. यानिमित्त झालेल्या योगसंगम सामुहिक योग प्रक्षेपणात सर्व शाळांनी सहभाग घेतला. त्यापूर्वी आदल्या दिवशी २० जून रोजी केंद्रीय मंत्रालयाद्वारे दिलेल्या पोर्टलवर शाळांनी आपला सहभागही नोंदवला होता.